# केंद्र सरकार आणि विरोध पक्ष सत्ता-संबंध एक राजकिय विश्लेषण

**प्रा. डॉ. डोंगरे एल. बी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड (महाराष्ट्र)

संपुर्ण भारतीय राजकारण कॉंग्रेस पक्षाअंतर्गत केंद्रीत होते. कॉंग्रेस बाह्य राजकिय पक्षाची स्थीती हि नेहरु व इंदिरा गांधी कालखंडात गौन अवस्थेत होती. संपूर्ण भारतीय जनतेचा पाठींबा मिळविण्यात पं.ज.नेहरु आणि इंदिरागांधी यशस्वी झालेले होते. सर्व जनमानसाच्या मनात कॉंग्रेस व्यतिरिक्त कोणता पक्ष उरलेला नव्हता जे पक्ष होते ते बाल्यअवस्थेत होते. भारतीय कम्युनिस्ट पक्ष कॉंग्रेसमधील होता ज्याची स्थापना 1934 मध्ये कॉंग्रेसचा एक घटक पक्ष म्हणुन झालेला होता. आचार्य नरेंद्र देव, राम मनोहर लोहीया, मुखर्जी बाबासाहेब आंबेडकर हे प्रभावी विरोधी पक्ष नेते म्हणुन समोर आलेले होते. कम्युनिष्टांचा प्रभाव हा केवळ केरळ व पश्चिम बंगाल पुरताच मर्यादीत होता. त्यामुळे भारतीय सत्ता केंद्रावर कॉंग्रेसपक्षाचे वर्चस्वचा कालखंड हा मोठा दिसतो. हा सर्वसामान्य जनतेचा पक्ष म्हणुन ओळखल्या गेला.

1969 चौथी लोकसभा, 1977-79 सहावी तर 1989-90 नववी 13 वी व या लोकसभेत विरोधी पक्षाला थोड्याफार प्रमाणात बहुमत मिळाल्यामुळे सरकार स्थापन करता आले. 10 वी 11 वी लोकसभा विरोधी पक्ष म्हणुन तर 14 वी व 15 वी लोकसभेत भाजपा ने विरोधी पक्ष म्हणुन कार्य केले.

सत्ताधारी पक्षाच्या प्रत्येक चुकीच्या कार्यावर त्यांनी जनतेचे लक्ष केंद्रीत केले. राजकारणातील गैरसमज दुर केले. राजकारण लोकाभिमुख करण्याचे काम केले. उपेक्षीतांचे दुःख दुर करण्याचे प्रयत्न केले स्वातंत्र्याच्या सुरूवातीच्या काळात भारतीय राजकारणात प्रभावी विरोधी पक्षाच्या अभावी संसदेत मोठी पोकळी निर्माण झाली होती. विरोधी पक्षांनी लोकतांत्रिक चरित्र टिकविण्यात महत्त्वपूर्ण भुमिका पार पाडली सुरूवातीला कॉंग्रेसपक्षावर नियंत्रण ठेवले यामुळे कॉंग्रेसअंतर्गत असलेल्या विविध गटामध्ये शक्तिसंतुलन बदलत गेले. या पक्षांनी लोकशाहीतील राजकिय पक्षाच्या संभावनेला जिवंत केले यामुळे लोकशाही विरुद्ध जनमत बनु दिले नाही. विरोधी पक्षानी असे नेतृत्व तयार केले कि पुढील काळात या नेतृत्त्वाने देशाच्या हिताचे संरक्षण व संवर्धन केले. जसे जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवानी, राममनोहर लोहीया, व्यापक जनआंदोलन केले गरिबांच्या अधिकारासाठी लोकशाही ची पुनर्रस्थापना करण्याचा प्रयत्न या नेतृत्त्वाने केला. पक्ष नंतर मोठे झालेले दिसून येतात. तेलगुदेशम अन्नाद्रमुक, शिवसेना इ. यांनी अघाड्यांचे राजकारण केलेले दिसून येते 1989, 1996, 1998, 1999, 2004 तिसरी आघाडी निर्माण झाली.

प्रस्तुत संशोधन निबंधाच्य मध्यमातून भारतीय केंद्र सरकार व विरोधीपक्षाच्या सत्ता संघर्षाच्या राजकिय जीवनातील घटकाचा अभ्यास केलेला आहे.

**उद्दिष्ट्ये :-**

1. सत्ता संघर्षाच्या घडामोडींचा आढावा घेणे.
2. सत्तासंघर्षात विरोधी पक्षाची भुमिका जानुन देणे.
3. सत्ता संघर्षात आघाड्यांच्या राजकारणाचा अभ्यास करणे.
4. सत्ता संघर्षात सत्तेच्या दुरूपयोग जाणुन घेने.
5. सत्ता संघर्षात भारत-चीन युद्ध, भारत-पाक युद्ध, युनोत भारताची भुमिका, आशियन सार्क संघटना, विकास परिषद, जी-08 परिषद, यात भुमिका जाणुन घेने.

**गृहित कृत्य :-**

1. स्वातंत्र्यानंतर सुरूवातीच्या काळात कॉंग्रेसपक्ष जनप्रवाही पक्ष होता.

2. स्वातंत्र्यानंतर युगात विरोधी पक्ष कमकुवत करण्याचे प्रयत्न सत्ताधारी पक्षाकडून झाले.
3. पं.ज.नेहरु नंतर सत्तासंघर्षात आघाड्याच्या राजकारणास प्रारंभ झाला.
4. इंदिरागांधी युगीन सत्ता संघर्षात विरोधीपक्ष कमकुवत ठरला होता.
5. राजकिय विकासात विरोधी पक्षांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

**नेहरु युग - सत्ता संघर्ष**

देशातील प्रथम निवडणुकीमध्ये 17 करोड मतदार होते. 3200 उमेदवार उभे होते. या करिता 3 लाख कर्मचारी कार्यरत होते. निवडणुक आयुक्त म्हणुन सुकुमारसेन यांनी कार्य पाहीले होते यावेळेस भारतीय लोकशाहीची परिक्षा होती संपुर्ण विश्वसमुदायाचे लक्ष देशातील या निवडणुकीवर होते त्यामुळे दोन वेळेस या निवडणुका सुरू कराव्या लागल्या एकाजागेसाठी 04 उमेदवार उभे करण्यात आलेले होते.

हिदुस्थान टाईम्स मध्ये असे म्हटल्या गेले होते. कि यह बात हर जगह मानी जा रही है कि भारतीय जनता ने विश्व के इतिहास में लोकतंत्र के सबसे बडे प्रयोग को बखुबी अंजाम दिया या निवडणुकी मध्ये जनसंघाचे प्रमुख याचा प्रसाद मुखर्जी यांनी एकदेशी एक संस्कृती और एकराष्ट्र या विचारावर भर दिला होता त्यासाठी जैविक हत्यार निर्मीतीची मागणी केली होती. अमेरिका महासत्तेला पाठींबा देऊन युनोच्या सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यत्वाचे समर्थन केलेले होते तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देखील याचे समर्थन केले होते.

25 ऑक्टो. 1951 ते मार्च 1952 या कालखंडात चार टप्प्यात झाल्या. पं. ज. नेहरुंच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे व स्वातंत्र्य लढ्यातील आंदोलनाच्या वारसामुळे भारतीय कॉंग्रेस पक्षाला एकुण 489 जागा पैकी 245 जागा मिळाल्या बहुमताने निवडणुक आल्या. दुसऱ्या क्रमांकावर आ. कम्बु. पाठी हा पक्ष होता. त्याला 16 जागा मिळाल्या विरोधी पक्ष म्हणुन 10% मतदान हवे पण ते कोणत्याच विरोधी पक्षाकडे नव्हते. जनसंघाला 03 जागा मिळल्या होत्या.कॉंग्रेस पक्षाने सत्ताधारी व विरोधक म्हणुन कार्याचा काळात केलेले आहे. विरोधी पक्षनेते म्हणुन श्रीपाद अमृत डांगे यांची निवड करण्यात आली होती. राममनोहर लोहीया, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी त्या कालखंडात विरोधी पक्षनेते म्हणुन महत्वपूर्ण भुमिका पारपाडलेली दिसून येते.

देशात सर्व प्रथम पंजाब या घटक राज्यात राज्य आणिबाणी लागु करण्यात आली. 1957 च्या लोकसभा व विधीमंडळ निवडणुका झाल्या त्यामध्ये कॉंग्रेसपक्ष बहुमताने निवडुन आला. केरळ मध्ये कम्युनिस्ट पक्ष बहुमताने निवडुन आला पण हे सरकार पाडण्यात आले. तिसरी लोकसभा निवडणुक 19 फेब्रु. ते 25 फेब्रु. 1962 मध्ये घेण्यात आली. एकुण जागा 494 होत्या बहुमतासाठी 248 जागा हव्या होत्या कॉंग्रेस पक्षाला 361 जागा मिळाल्या त्यावेळेस कम्युनिस्ट पक्षाला 27 जागा मिळाल्या कॉंग्रेस मध्यममार्गी पक्ष म्हणुन समोर आला. विरोधी पक्षाचे मोठे आव्हान कॉंग्रेस पक्षाला या काळात नव्हते कारण कॉंग्रेस पक्षाच्या दंशावा मध्ये देखील विरोधी पक्षाला जागा मिळाल्या नव्हत्या. जन आंदोलनाचे रुप कॉंग्रेस पक्षाला मिळाले होते.

**कॉंग्रेसचे विभाजन 1969 आणि इंदिरा गांधी यांचे नेतृत्व :-**

पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या निधनानंतर कामकाज हे कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते. त्यांच्या नेतृत्त्वात कॉंग्रेस पक्षाने नेहरुनंतर लालबहादुर शास्त्री यांची भारताचा पंतप्रधान म्हणुन निवड केली पण ताश्कंद करार करण्यासाठी रशियात गेल्यानंतर त्यांचे निधन झाले त्यामुळे पुन्हा भारतीय राजकारणात नेतृत्त्वाची पोकळी निर्माण झाली 1967 ला निवडणुका झाल्या त्यामध्ये 283 जागा कॉंग्रेसला मिळाल्या तर स्वतंत्र पक्षाला 29 जागा मिळाल्या शास्त्रीजी यांच्या काळात इंदिरागांधी प्रसार मंत्री होत्या तर नेहरु यांच्या काळात 1959 मध्ये अध्यक्ष म्हणुन अधिवेशनात कार्य केले होते. कॉंग्रेस पक्षाला खरे आव्हान विरोधी पक्षाचे नव्हते 12 पक्षांतर्गत गटाचे होते ग्रैंड अलायन्स विरोधी पक्षाचा कार्यक्रम हा केवळ इंदिरा हराओ हा होता. यामध्ये एस.एस.पी.,

पी.एस.पी. भारतीय जनसंघ, स्वंतत्र पार्टी, भारतीय क्रान्तीदल एकत्रीत आलेले होते. त्यांच्या जवळ कोणत्याच प्रकारचा कॉंग्रेस पक्षाच्या विरोधात राष्ट्रीय जनहिताचा कार्यक्रम नव्हता. सरकारी अधिकार हा खाजगी अधिकार म्हणुन वापर होत आहे असे आरोप विरोधी पक्षानी केला होता. इंदिरागांधीचा सत्तेचा वापर व्यक्तिगत अधिकार म्हणुन वापरतात असा आरोप त्यांच्यावर विरोधकांनी केलेला होता.

1969 मध्ये कॉंग्रेसची कामराज नादार, मोरारजी देसाई, अनेकजुनी मंडळी इंदीरा गांधीयांच्या विरूद्ध एकत्र आली या वेळेस कॉंग्रेस संघटना पक्ष- राम सुभाषसिंह देशाचे प्रथम अधिकृत विरोधी पक्षनेते म्हणुन 17 डिसेंबर 1969 ते 20 डिसेंबर 1970 निवडुन आले.

1 मार्च 1971 ते 10 मार्च 1971 या काळात पाचव्या लोसभा निवडणुका घेण्यात आल्या एकुण 520 जागांसाठी 260 जागाचे बहुमत हवे होते. कॉंग्रेस पक्षाला 252 तर भारतीय जनसंघाचा 22 तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाला 23 जागा मिळाल्या मुळ कॉंग्रेस पक्ष कोनाच्या बाबत कॉंग्रेस पक्षामध्ये दोनगट निर्माण झालेले होते.याबाबत कॉंग्रेस पक्षातंर्गत वर्चस्वाचे सत्ता संघर्ष चालु होते. कॉंग्रेस सिंडीकेट-इंदिरागांधी तर कॉंग्रेस इंडिकेट-मोरारजी देसाई होते. जनतेचे स्पष्ट बहुमत इंदिरागांधी यांच्याकडून दिले. राष्ट्रपतीच्या निवडणुकीत इंदिरागांधी यांच्या नेतृत्त्वाचा विजय झाला. त्यामुळे कॉंग्रेस पक्षांतर्गत मोठी फुट पडली.

1995 आणिबाणीचा काळ जो इंदिरागांधी यांच्या विरोधात संपूर्ण जनतेच्या एकत्रीतकरणाचे काम जयप्रकाश नारायण यांनी केले त्यामुळे लोकसभेच्या सहाव्या निवडणुकीत म्हणजे 16 मार्च 1977 ते 20 मार्च 1977 या काळात 542 जागांसाठी निवडणुका घेण्यात आल्या यामध्ये जनता पक्षास 295 जागा मिळाल्या तर कॉंग्रेस पक्षाला 154 यशवंतराव चव्हाण 23 मार्च 1977 ते 12 एप्रिल 1978 व 10 जुलै ते 18 जुलै 1979 विरोधी पक्ष नेते होते. दुसरे सि.एम.स्टिफन तर जगजीवनराम हे एकानंतर एक विरोधी पक्ष नेते होते. यानंतर इंदिरागांधी एकहाती सत्ता निर्माण झाली. सातवी लोकसभा निवडणुक 3 जाने 1980 542 जागांसाठी घेण्यात आली यामध्ये कॉंग्रेस पक्षाच्या 351 जागा मिळाल्या जनता पक्षाला 41 जागा मिळाल्या चौधरी चरणसिंह हे विरोधी पक्षनेते होते 1983 इंदिरागांधी यांची हत्या झाली.

**राजीव गांधी काळ :** त्यामुळे आठवी लोकसभा निवडणुका 24 डिसेंबर ते 8 डिसेंबर 1984 रोजी घेण्यात आल्या. त्यामध्ये एकुण 533 जागामधून कॉंग्रेस पक्षाच्या प्रचंड बहुमत मिळाले. तेलगु देशम केवळ 30 जागा मिळाल्या त्यामुळे एन.टी. रामाराव हे विरोधी पक्षनेते होते.

नववी लोकसभा निवडणुक 22 आणि 26 नाव्हें. 1989 रोजी दोन टप्प्यात घेण्यात आल्या. 545 जागांसाठी निवडणुका घेण्यात आल्या बहुमतासाठी 273 जागा होत्या कॉंग्रेस पक्षाच्या 197 जागा मिळाल्या तर जनता पार्टीला 142 जागा सर्वात जास्त जागा मिळुन देखील कॉंग्रेस पक्षाने सरकार बनविले नाही. राजीव गांधी विरोधी पक्षनेते राहीले. या काळात त्यांच्यावर कॉंग्रेस विरोधी पक्षानी बोफोर्स घोटाळ्यांचा आरोप लावला होता.

**आघाड्यांचे राजकारण :-**

दहाव्या लोकसभा निवडणुका 20 में ते 12 जुन 1991 ला तीन टप्प्यात घेण्यात आल्या एकूण जागा 545 होत्या त्यापैकी 273 बहुमतासाठी होत्या त्यामधून 244 जागा कॉंग्रेसला मिळाल्या तर जनता पार्टीला 121 जागा मिळाल्या या काळात पी.व्ही.नृसिहराव पंतप्रधान झाले तर अर्थमंत्री म्हणुन मनमोहनसिंह यांचा बनविण्यात आले कारण राजीव गांधी यांची पेरांबुर येथील तामीळनाडू येथील निवडणुकीच्या प्रचारा दरम्यान मानवी बॉम्बद्वारे हत्या करण्यात आली त्यामुळे कॉंग्रेसपक्षात नेतृत्त्वाची पोकळी निर्माण झालेली होती.

मनमोहनसिंह यांनी जागतिकीकरणाचा पुरस्कर केला. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाला गती दिली. याकाळात विरोधी पक्षनेता म्हणुन लालकृष्ण अडवाणी दि.12 जुन 1991 ते 15 जुलै 1993 तर अटलबिहारी

वाजपेयी 26 जुलै 1993 ते 10 मे 1996 नंतर पुढे पी.व्ही. नरसिंगराव 16 मे 1996 ते 1 जून 1996 पर्यंत विरोधी पक्षनेते होते.

11 वी लोकसभा निवडणुक 27 एप्रिल ते 7 मे 1996 मध्ये झाली 545 जागांसाठी हि निवडणुक घेण्यात आली होती. त्यामध्ये भा.ज.पा ला 161 जागा मिळाल्या तर काँग्रेस पक्षाला 140 जागा बहुमतासाठी 273 जागा हव्या होत्या या काळात भारतीय राजकारणात अस्थीरता निर्माण झालेली होती. या काळात देशाला तीन पंतप्रधान होऊन गेलेत. अटलबिहारी वाजपेयी 13 दिवसाचे सरकार तर 11 महिण्यासाठी देवगौडा यांचे सरकार बनलेले होते तसेच 11 महिने गुजराल सरकारचे होते. या दरम्यान विरोधी पक्ष नेता म्हणुन अटल बिहारी वाजपेयी यांनी 1 जून 1997 ते 4 डिसेंबर 1997 मध्ये पार पाडली.

16 फेब्रु.1998 ते 28 फेब्रु.1998 दरम्यान 12 व्या लोकसभेसाठी निवडणुका घेण्यात आल्या या तीन टप्प्यात निवडणुका होत्या. 545 जागांसाठी घेण्यात आलेल्या निवडणुकीमध्ये 273 बहुमतांसाठी आकडा होता. भाजपाला 181 तर काँग्रेस पक्षाला 141 जागा मिळाल्या. याकाळात अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्त्वाखाली आघाडी सरकार एकामताने राहुन गेले.

19 मार्च 1998 ते 26 एप्रिल 1991 मध्ये शरद पवार हे लोकसभेचे विरोधी पक्ष नेते होते. याच काळात अटल बिहारी वाजपेयी यांनी अणुचाचण्या केल्या त्यांच्या नेतृत्वामुळे भा.ज.पा.ला बळ मिळाले.

5 सप्टेंबर ते 5 ऑक्टोंबर 1999 ला तेरावी लोकसभा निवडणुका झाल्या त्या 545 जागा साठी त्यामध्ये भाजपाला 180 तर काँग्रेसच्या 114 जागा मिळाल्या आघाडी सरकार स्थापन झाले अटलबिहारी वाजपेय यांनी सरकारचे नेतृत्व केले. 13 ऑक्टोंबर 1999 ते 6 फेब्रुवारी 2004 या काळात विरोधी पक्ष नेता म्हणुन सोनिया गांधी यांनी कार्य केले. वाजपेय सरकारवर त्यांनी प्रचंड टिका केली.

चौदावी लोकसभा निवडणुक 20 एप्रिल ते 10 मे. 2004 रोजी चार टप्प्यात झाल्या 543 जागांसाठीचा निवडणुका घेण्यात आल्या यामध्ये भाजपा 138 जागा मिळाल्या तर काँग्रेसच्या 145 जागा मिळाल्या यु.पी.ए. च्या सरकारच्या काळात लालकृष्ण अडवाणी यांनी विरोधी पक्षनेता म्हणुन कार्य केले. सत्ताधारी पक्षाच्या अयोग्य कार्यावर त्यांनी टिका केली. मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व घोटाळे झाले. लालकृष्ण अडवाणी 22 मे 2004 ते 18 मे 2009 पर्यंत विरोधी पक्ष नेते म्हणुन काम केले.

15 व्या लोकसभेच्या निवडणुका 16 एप्रिल ते 13 मे 2009 या काळात झाल्या 545 जागांसाठी होत्या. बहुमतासाठी 272 जागा हव्या होत्या भाजपाला 116 जागामिळाल्या तर काँग्रेस पक्षाला 206 होत्या. विरोधी पक्ष नेते म्हणुन लालकृष्ण अडवाणी तर 21 डिसेंबर 2009 ते 18 मे. 2014 मध्ये सुष्मा स्वराज यांनी विरोधी पक्षनेते म्हणुन कार्य केले. या सरकारच्या काळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे घोटाळे उघडे पडले होते.

2014 साली 16 व्या लोकसभासाठी 7 एप्रिल ते 12 मे 2014 दरम्यान 9 टप्प्यात निवडणुका घेण्यात आल्या यामध्ये भाजपाला 282 जागा मिळाल्या तर काँग्रेस पक्षाला केवळ 44 जागा मिळाल्या विरोधी पक्ष म्हणुन 10 टक्के जागा हव्या असतात त्या काँग्रेसकडे नसल्यामुळे विरोधीपक्ष नेते हे पद रिक्त आहे.

11 एप्रिल ते 19 मे 2019 या दरम्यान सतराव्या लोकसभेसाठी 543 जागांसाठी निवडणुका 07 टप्प्यामध्ये घेण्यात आल्या यामध्ये 303 जागा भाजपाला मिळल्या तर काँग्रेसला 52 जागा मिळाल्या.

**निष्कर्ष :-**

1) भारत देशातील लोकशाहीचा पाया मजबुत करण्यासाठी स्वतंत्र वातावरणातील मान्यता प्राप्त प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव दिसुन येते.
2) विरोधी पक्ष आहेत जबाबदार पक्ष म्हणुन प्रामाणिकपणे कार्य करण्याची आवश्यकता आहे.

3) विरोधी पक्ष शासनाच्या प्रत्येक कृतीवर नियंत्रण ठेवून त्या बाबत जनतेच्या भावनेचे प्रदर्शन करणे आवश्यक आहे तरच लोकशाहीचे संरक्षण होईल.
4) वैयक्तिक शासनाचा प्रयत्न होने गरजेचे आहे त्यातून पायाभूत रचनात्मक कार्य होईल.
5) सत्ताधारी पक्ष घटनात्मक संस्थांचा चुकिच्या पद्धतीने वापर करुन विरोधी पक्षाला कमकुवत किंवा त्यांचा आवाज दाबल्याचे दिसुन येते.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**


1. पाटील बी.बी. - राज्यशास्त्र-फडके प्रकाशन 2007
2. पळशीकर सुहास - समकालीन भारतीय राजकारण, प्रतिमा प्रकाशन 2004, पुणे.
3. कुलकर्णी सुहास - जातीचा प्रश्न आणि वि.रा.भिंडे बहुजन संकल्पना राज्यशास्त्र आणि लोक प्रशासन विभाग पुणे, अप्रकाशित पीएच.डी प्रबंध.
4. दै.लोकसत्ता
5. महाराष्ट्र टाईम्स